# मिरा भाईंदर महानगरपालिका
## शिक्षण विभाग
### मा. महासभा दि.२३/ ६ /२०२१
### // गोषवारा //

प्रकरण क्रमांक (३२) :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

आपणांस विनंतीपुर्वक सादर करते की, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मराठी, हिंदी, गुजराती आणि उर्दु माध्यमांच्या मनपाच्या ३६ शाळा असुन या शाळांमध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता १ ली ते ४ थी चे २८४६ विद्यार्थी आणि इयत्ता ५वी ते ८ वी चे ३३६७ विद्यार्थी असे एकुण ६२१३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. कोविड साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शाळा चालु न करता ऑनलाईन पद्धतीने शिक्षण दिले जात होते.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये एकुण पटसंख्या ६२१३ विद्यार्थी होते त्यापैकी २७२३ विद्यार्थ्यांकडे ॲन्ड्रॉईड फोन होता. या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण गेल्या वर्षी सुरु होते. त्याचप्रमाणे शासनाच्या विविध उपक्रम (SCERT) तर्फे ई-लर्निंग सेवा, गोष्टीचा शनिवार उपक्रम, गल्लीगल्ली सीम सीम मालिका व टिलीमिली मालिका असे उपक्रम टी. व्ही द्वारे विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले होते.

मा. शिक्षण संचालकांकडील आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा (विदर्भ वगळता) या सर्व शाळांचे शैक्षणिक वर्ष दि. १५ जुन, २०२१ पासुन सुरु करण्याबाबत आदेशित केलेले असुन त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा दि. १५ जुन, २०२१ पासुन कोविड साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष शाळा चालु न करता ऑनलाईन पद्धतीने शिक्षण द्यावे असे निर्देश देण्यात आलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी आर्थिक दुर्बल घटकातील आहेत. या विद्यार्थ्यांकडे मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप, इंटरनेट इ. उपलब्ध नसल्याने अभ्यासाकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे तसेच शिक्षकांनाही विद्यार्थ्यांना शिकविता येत नाही.

दि.२१ मार्च, २०२० पासुन ऑफलाईन शाळा बंद आहेत व जुलै ते सप्टेंबर महिन्यात कोरोना प्रादुर्भावाची तिसरी लाट येण्याची शक्यता असुन या लाटेमध्ये लहान मुलांना कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता असल्याने यावर्षी ऑफलाईन शाळा सुरु होण्याची शक्यता कमी वाटते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते.

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबचा पुरवठा करणेबाबत मा. महापौर, मिरा भाईंदर मनपा यांनी लेखी निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणुन या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेमार्फत मोबाईल अथवा टॅब व इंटरनेटची सुविधा उपलब्ध

करुन द्यावी. सदर सुविधा उपलब्ध करुन दिल्यास या विद्यार्थ्यांना शिक्षण देणे सोयीचे होईल व हे विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहणार नाही.

एका टॅबसाठी अंदाजे रु.५,०००/- ते रु.१०,०००/- चा खर्च अपेशिक्षत आहे. हया कामासाठी शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकात तरतुद नाही परंतु अंदापत्रकातील लेखाशिर्ष शिक्षण अनु.क्र.०५ सांकेतांक क्र. २५३४ विद्यार्थी गणवेश/बॅच/टाय/पी. टी. युनिफॉर्म यासाठी रु.१,००,००,०००/- (अक्षरी एक कोटी मात्र) व अनु.क्र.०७ शालेय विद्यार्थी दप्तरे/बुट/मौजे/वॉटर बॉटल यासाठी रु.५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लाख मात्र) ची तरतुद आहे. सदर अर्थ संकल्पिय तरतुद अपुरी असल्याने इतर विभागातील तरतुदीचे पुर्नविनियोजन करुन त्या तरतुदीचा वापर विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबचे खरेदी करणेकामी करता येईल.

शालेय विदयार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणासाठी मोबाईल अथवा टॅब पुरविणेबाबत महानगरपालिकेचे धोरण निश्चित नसल्याने त्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) शालेय विदयार्थ्यांना मोबाईल किंवा टॅब यापैकी एक व इंटरनेट पॅकसह सरसकट सर्व वर्गांच्या विदयार्थ्यांना किंवा ५ वी ते ८ वीचे विदयार्थ्यांना पुरविणेबाबत निर्णय घेणे.

२) गणवेश, दप्तर व इतर शैक्षणिक साहित्य यांची अंदाजपत्रकीय तरतुद वापरल्यास प्रत्यक्ष शाळा चालु झालेनंतर गणवेश, दप्तर व इतर शैक्षणिक साहित्य पुरविणेबाबत अंदाजपत्रकीय तरतुद करणे.

३) मोबाईल/टॅब CSR मधुन निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव करणे

तरी वरील मुद्दा क्र. १ ते ३ बाबत धोरण ठरवुन मोबाईल/टॅब खरेदीसाठी अंदाजपत्रकामध्ये नवीन लेखाशिर्ष तयार करुन त्यासाठीची तरतुद पुर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन विदयार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबचे खरेदी करणेकामी लागणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव सविनय सादर.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका